**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==========================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
----------------------------------------------------------
**Vol 11.Issue 3; March 2024**
==========================================================

# 'संत साहित्याची प्रासंगिकता ( विशेष संदर्भ : कबीर)'

**डॉ.प्रमोद भगवान पडवळ**
**प्राध्यापक आणि प्रमुख, मराठी विभाग,**
**काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी**

**प्रास्ताविक :**

मानवी मूल्यांच्या रूजवणूकीसाठी प्रत्येक युगात थोर पुरुषांनी प्रचंड संघर्ष केलेला आहे आणि त्यात ते सफलही झालेले आहेत.पैगंबर महंमद, भगवान गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, गुरू नानकदेव असोत की आंडाळ, संत कुलशेखर आलवार,तिरुवल्लुवर, चाउंडराय, अक्कमहादेवी, अन्नमाचार्य, शंकरदेव,बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम,नरसी मेहता, प्रेमानंद भट,दादू दयाल,मीराबाई, कवी ब्रह्मानंद,जयदेव, चैतन्य महाप्रभू, परमानंद, संत कबीर, आचार्य तुलसीदास, संत रविदास, सूरदासया सर्व महात्म्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनकल्याणासाठी खर्ची घातलेले आहे संतांचे विज्ञानवादी विचार प्रत्येक पिढीला प्रेरणादायी ठरत आलेले आहे आणि आजही हे विचार तितकेच प्रासंगिक आहे.डॉ.यू.म.पठाण म्हणतात,'संत साहित्य म्हणजे भाबडेपणा किंवा अंधश्रद्धा नाही. मनुष्य करीत असलेल्या कर्माचे रुपांतर कर्मकांडात होऊ नये, यासाठी लक्ष्मणरेषा आखण्याचे काम संत करतात. विज्ञान आणि धर्माची सांगड घालताना जीवनाला उपयोगी पडेल त्याच्यातच देवत्व शोधले पाहिजे असे संताना वाटते.' (लोकसत्ता,१२ डिसेंबर,२०१२) डॉ.पठाण यांचे उपरोक्त विचार समर्थनीय आहेत.प्रस्तुत लेखात कबीरांच्या काव्याच्या प्रासंगिकतेवर प्रकाश टाकलेला आहे.

**कबीरकालीन समाज** :

कबीर १५व्या शतकात होऊन गेले. त्यांच्या जन्म व मृत्यू तिथी संदर्भात अनेक मतमतांतरे असली तरी डॉ.केदारनाथ द्विवेदींच्या मते कबीरांचा जन्म इ.स.१३६८ व मृत्यू इस.१४४८ चा आहे. प्रभाकर माचवे यांच्या मते कबीरांचा काळ १३९८ - १५१८ आहे.कबीर ज्या कालखंडात प्रकट झाले तो काळ सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय विपन्नतेचा होता. त्या काळातील समाज अनेक समस्यांना सामोरे जात होता. या काळात कबीरांनी अत्यंत गांभीर्याने कुठल्याही समूहाला झुकते माप न देता निष्पक्ष भावनेने जीवनातील सत्य अनुभव प्रस्तुत केले. आज आपण पाहतो की माणसा-माणसांतील सौहार्दाची भावना नामशेष झाली आहे. अशा वेळी कबीरांचे स्मरण करणे क्रमप्राप्त ठरते. माणूस माणसाकडे एक व्यक्ती म्हणून न पाहता जाती, वर्ग, धर्म,संप्रदायाच्या संकुचित चष्म्यातून पाहात आहे. आज धर्माला पराकोटीचे प्रदूषित केलेले आहे. धर्मातील आध्यात्मिकता आणि उदात्तता याला ग्रहण लागले आहे. अशा या बिकट क्षणी पूर्वसूरींच्या संत, महात्मा, विद्वान महानुभावांची आठवण पुन्हा पुन्हा होणे स्वाभाविक आहे. साधारणपणे असे म्हटले जाते की प्रत्येक काळातील साहित्य त्या काळाचा इतिहास घेऊन अवतरीत झालेले असते. काही प्रतिभाशाली साहित्यकारांचे साहित्य त्यांच्या काळाला कवेत घेतेच घेते त्याचबरोबर काळाच्याही पुढे जाण्याची क्षमता घेऊन अवतरत असते. त्यामुळे काळाच्या प्रत्येक टप्प्यावर ते प्रासंगिकच असते. कबीरांना जगाच्या वास्तव परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. त्यांचा युगबोध आणि आत्मबोध अत्यंत सूक्ष्म आणि तत्त्वपूर्ण होता

त्यांचा उपदेश म्हणजे स्वानुभव आहे. त्यांनी सांगितलेली नैतिक मूल्ये ही वरवरची नसून त्यांच्या जीवनाचा निष्कर्ष आणि सार आहे. त्यांच्या साहित्यातील नैतिक मूल्ये प्रत्येक काळातील समाजाला प्रेरित करत आलेली आहेत. कबीरांनी आपल्या रचनेतून जे इशारे दिलेले आहेत ते समाजाला सदैव कल्याणकारी ठरत आलेले आहेत. त्याचे महत्त्व कालही होते आजही आहे आणि भविष्यातही असणार आहे. जसा काळ प्रवाहमान असतो तसाच काळातील सामाजिक, धार्मिक समस्याही प्रवाहमान राहत आलेल्या आहेत. कबीरांच्या काळात ज्या समस्या होत्या त्या पाचशे वर्षे झाली तरीही जशाच्या तशा आहेत. जातीभेद, वर्णभेद, धार्मिक कट्टरता, अंधश्रद्धा, कर्मकांड यांसारख्या सामाजिक विसंगती आजही कायम आहेत. कबीरांनी या सर्व समस्या आणि विसंगतीचे निर्मूलन करण्यासाठी वाणीद्वारा जो प्रयास केला त्याचे महत्त्व आजही कायम आहे किंबहुना ते तसूभरही कमी झालेले नाही

**वर्णव्यवस्था विरोध :**

ज्या युगात कबीर अवतरले त्या युगातील सार्वजनिक जीवन पूर्ण अस्तव्यस्त झालेले होते. समाजाचे नैतिक पतन टोकाचे झाले होते. कबीरांच्या समोर असलेल्या वर्णव्यवस्थेमध्ये समाजातील उच्चवर्णीय समूह समाजाचे नेतृत्व करत होता शूद्रांना अपवित्र मानून उपेक्षित जीवन जगण्यास भाग पाडले जात होते. कबीरांचा अर्थात या व्यवस्थेला विरोध होता. त्यांना वर्गहीन समाज अपेक्षित होता. कबीरांचा वर्गहीन समाज कार्लमार्क्स आणि लेनिनच्या वर्गहीन समाजापेक्षा वेगळा होता. कारण कार्लमार्क्स व लेनिनच्या कल्पनेतील समाजात ईश्वराला अजिबात स्थान नव्हते मात्र कबीर ईश्वराला मानणारे होते. विविध धर्मग्रंथांच्या आधाराने प्रस्तुत केलेली वर्णव्यवस्था ही कबीरांच्या मते वैज्ञानिक आणि विश्वसनीय कधीच असू शकत नाही.कबीर स्वतः अशा कुटुंबात वाढले होते ते कुटुंब शूद्र गणले जात होते. अस्पृश्यतेचा दंश कबीरांनी अनुभवलेला होता. कबीर म्हणत जन्माने सर्व मानव जात समान आहे. कबीर जातीपातीपेक्षा कर्माला श्रेष्ठ मानत होते.ते म्हणतात,' ऊँचे कुल क्या जननियाँ, जे करणी ऊँच न होई । सोवन कलस सुरै भरया, साधु निंदा सोई ॥'

**मूर्तिपूजेला विरोध :**

आजच्या काळातील मूर्तिपूजेचे अवडंबर पाहता कबीरकालीन परिस्थिती काय असावी याबद्दल अंदाज बांधणे सहज शक्य होते. धर्माच्या ठेकेदारांनी ईश्वराला मंदिर आणि मस्जिदमध्ये कैद केले होते. ईश्वरापर्यंत पोहचवणारे, मुक्ती मिळवून देणारे धर्मातील दलालसामान्य भोळ्याभाबड्या जनतेचे शोषण करत होते.त्या काळात जे चित्र होते ते आजही कायम आहे. जेवढी माणसे तेवढेच देव अशी स्थिती होती. अशा काळात कबीरांनी मुर्तीपुजेतील निरर्थकता पटवून दिली कबीर म्हणतात,' पाहन पूजै हरि मिलै, तो मैं पूजूँ पहार ।तातै वह चक्की भली, पीस खाय संसार ॥' ( अगर पत्थर पूजने से भगवान मिलते तो मैं पर्वत पूजूँगा । इन मूर्तियों के पत्थर से तो घर की चक्की भली है जिसका पीसा आटा लोग खाते हैं ।)

किंवा

'पाहन कूँ का पूजिये, जे जनम न देइ जवाब'

मंदिर आणि मूर्ती हे दोन्ही दगडाचेच आहेत. या मूर्तीला बनवणाराच मूर्तीची पूजा करत आहे तर पूजा करणाराला ईश्वराने निर्माण केले आहे. पूजा करणारा एवढा आंधळा आहे की ज्याला त्याने बनवले आहे त्याचीच तो पूजा करत आहे. ज्या ईश्वराने संपूर्ण सृष्टीची निर्मिती केली आहे त्या ईश्वराच्या मूर्तीच्या निर्मितीचा अहंकार मानवाच्या ठिकाणी आहे. 'पत्थर ही का देहु रा, पाथर का ही देव पूजणहारा अन्धरा, लागा खोटी सेव ॥'पूजेच्या वेळी मूर्तीला भोग -प्रसाद चढवून उरलेला सर्व प्रसाद पुजाऱ्याच्या झोकळीत कसा जातो याचे मार्मिक वर्णन कबीर करतात'लाडू लावन, लापसी, पूजा चढे अपर ।पूजि पुजारी ले गया, मूरत के मूहिं छार ॥'कबीरांनी बाहय आचरणाचा विरोध केला आहे.'माथे तिलक हथि माला बाना, लोगन रामु खिलउना जाना ।'कबीर म्हणतात लोक माळ हातात घेऊन स्वतःला खूप मोठे भक्त समजतात. त्याचबरोबर सामान्य लोकांवर मोहिनी घालून अंधश्रद्धेच्या जाळ्यात ओढतात. कबीर प्रश्न विचारतात की गळ्यात माळ घालणे आणि कपाळावर गंध लावण्याने ईश्वरप्राप्ती शक्य आहे ?

'कबीर माला मन की, और संसारी भेष ।
माला पहन्या हरि मिले, तो अरहट के गलि देव ॥'

**कथनी पेक्षा करणीवर भर :**

'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले असे तुकारामांनी म्हटलेले आहे. उक्ती आणि कृती यांत सांगड असेल तर समाजात मान मिळतो. मात्र 'लोका सांगे ब्रहमज्ञान स्वतः कोरडे पाषाण' ही प्रवृत्ती सर्रास दिसून येत आहे. कबीरांनी याचा सदैव निषेध करून कथनी व करणी यांचा मेळ कसा आवश्यक आहे, हे आपल्या दोहयातून सांगितले आहे. ते म्हणतात, ' करनी बिन कथनी कहै, गुरु पद लहै न सोय ।' कथनाचे महत्त्व तेव्हाच सार्थक होईल जेव्हा कृतीसुद्धा त्याला अनुकूल असेल 'कथनी बदनी छाडी दे, करनी सो चित लाय । नर जो जल प्याये बिना, कबहूँ प्यास न जाय ॥' कबीर म्हणतात की तोंडाने केवळ व्यर्थ बडबड करणे सोडून दे आणि कर्तव्यामध्ये मन गुंतव. जो मनुष्य पाणी पीत नाही त्याची तहान कशी भागणार ? जगात काही माणसे वक्तृत्वकलेत पारंगत असतात. मोठमोठ्या ज्ञानाच्या गप्पा मारतात; पण आचरणात मात्र शून्यवत असतात.कबीरांचा कथनीपेक्षा करणीवर मुख्यता भर होता. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःसाठी किंवा दुसऱ्यासाठी एखादी गोष्ट करण्याचे संकेत देते आणि प्रत्यक्षात ती गोष्ट व्यवहारात मूर्त करून दाखवते तेव्हा कथनी आणि करणीत अंतर नाही असे म्हटले जाते. काही व्यक्ती नुसत्याच बोलतात व्यवहारात त्याचे आचरण करताना दिसत नाहीत. कबीराच्या मते कथनी व करणीत एकवाक्यता असणाऱ्या व्यक्ती श्रेष्ठ असतात. गोस्वामी तुलसीदास सुद्धा कथनी करणीत भेद करणाऱ्या व्यक्तींविषयी म्हणतात,

'पर उपदेस कुसल बहु तेरे, जे आचरहिं ते नर न घनेरे ।'

बोलण्यात आणि आचरणात एकवाक्यता नसणाराविषयी कबीर म्हणतात, ' जैसी मुष तैं नींकसै,तैसी चाले नाहिं । मानिष नहीं ते स्वान गति, बाँध्या जमपुर जाहिं ॥' तोंडाने जे बोलतात त्याप्रमाणे वागत नाहीत त्यांचे यमसदन हेच स्थान आहे.

कबीर साहित्याचे अभ्यासक अफसर अली म्हणतात, " कबीर की वाणियों में कथनी और करनी की एकता थी ।उन्होंने व्यावहारिक आचरण की दृष्टि से दुसरों को उपदेश देने से पहले स्वयं को इन उपदेशों पर कसा, और वे इस दृष्टि से पूर्ण खरे उतरे ।" कबीरांनी एके ठिकाणी म्हटलेले आहे की मी जे काही बोलतो ते सर्वप्रथम स्वतःसाठीच असते. जेव्हा जेव्हा मी समोरच्या व्यक्तींमधील दोष शोधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मला स्वतःमधील दोष दिसू लागतात.

'बुरा जो देखने मैं चल्या, बुरा न दिषा कोइ ।
जे दिल खोजा आपनां, मुझसा बुरा न कोइ ॥'

**उपदेश :**

कबीरांनी औपचारिक शिक्षण घेतलेले नव्हते. ते निरक्षर होते, परंतु आपल्या मौखिक उपदेशातून लोकांना शहाणे करण्याचा त्यांनी जणू विडा उचलला होता. आपल्या निरक्षरतेची ते घोषणा करतात, ' मसि कागद छुयौ नहीं, कलम गह्यौ नहीं हाथ । चारिक जुग को महातम, मुखहिं जनाई बात ॥'कबीरांनी हिंदू-मुस्लिम समाजातील वाईट चालीरीती, रूढी परंपरांचा, धार्मिक कट्टरतेचा जोरदार विरोध केला. कबीरांच्या नजरेतून राम आणि रहीम एकच आहेत. फक्त वेगवेगळे लोक निरनिराळ्या नावांनी या ईश्वराला संबोधत असतात. धर्माच्या नावाखाली लोकांमध्ये दरी पाडणाऱ्यास कबीर कठोर शब्दांत सुनावतात. त्यांनी हिंदू-मुस्लिम यांच्यातील भेदभाव दूर करण्यासाठी निर्गुण भक्ती पंथाचा पुरस्कार केला. ज्या पंथात उच्च-नीच, स्त्री-पुरुष, जाती-पाती, श्रीमंत-गरीब असा भेदभाव नव्हता. जाति-पातीच्या भेदभावाला विसरून ते म्हणतात की ज्ञानाने मनुष्य सज्जन होतो विद्वान माणसाची कुठलीही जात नसते. ' जाति न पूछो साधु की, पूछ लीजिए ज्ञान ।मोल करो तलवार का, पड़ा रहन दो म्यान ॥'कबीरांनी आपल्या उपदेशात प्रेमाचे महात्म्य वर्णन केले आहे. 'पोथी पढ़ि-पढ़िजग मुआ, पंडित भय न कोय । ढाई आखर प्रेम का, पढ़े सो पंडित होय ॥'कबीर म्हणतात की जे लोग ईश्वराने बनवलेल्या माणसां-माणसांत भेदभाव करतात ते लोक मानवाच्या बरोबरीने ईश्वराचाही अपमान करतात.कबीरांनी सत्य विचारांचा हिरिरीने पुरस्कार केला. त्यांच्या मते मनुष्याच्या जीवनात, विचारांत सत्यता नसेल तर जप, तप, तीर्थ, होम, हवन, कर्मकांड, नमाज याला कसलाच अर्थ नाही. आधी सत्य मग इतर गोष्टी यांवर कबीर ठाम होते.ते म्हणतात, ' साँच बराबर तप नहीं, झूठ बराबर पाप । जाके हिरदय साँच है, ताके हिरदय आप ॥' आणखी अशी कितीतरी उदाहरणे देऊन कबीरांच्या विचारांची प्रासंगिकता सिद्ध करता येईल. केवळ कबीराच नव्हे तर अखिल भारतीय संत परंपरेतील महात्म्यांचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत आणि भविष्यातही या विचारांची प्रासंगिकता एक सुदृढ समाजबांधणीसाठी आवश्यक राहणार आहे. कबीर केवळ उत्तर भारतीय संत परंपरेतील महत्त्वाचे युगपुरुष नव्हते तर ते संपूर्ण भरतखंडाचे पथदर्शक होते.लेखाचा शेवट 'The Message Of Kabira's Bijaka' या R.K.Jha यांच्या कबीरांविषयीच्या मताने करू, ' Kabir had a multi - faceted personality. He was a philosopher, saint and social-religious reformer of the highest order.His whole life was an illustrious example of love, mercy, knowledge, honesty, truthfulness, spiritual realization, renunciation and discrimination. The different

aspects of his personality were mutually dependent and interactive.' तात्पर्य, कबीर यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते ते एक तत्त्वज्ञ, संत आणि सर्वोच्च दर्जाचे सामाजिक-धार्मिक सुधारक होते. त्यांचे संपूर्ण जीवन प्रेम, दया, ज्ञान, प्रामाणिकपणा, सत्यता, अध्यात्मिक अनुभूती, त्याग आणि विवेक यांचे उत्कृष्ट उदाहरण होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे वेगवेगळे पैलू एकमेकांवर अवलंबून आणि परस्परसंवादी होते.

**संदर्भ साहित्य :**

१. कबीर, आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी
२. संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, गं.बा.सरदार
३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा.नसिराबादकर
४. कबीर और कबीर-पंथ, डॉ.केदारनाथ द्विवेदी
५. The Message of Kabira's Bijak, R.K.Jha, Manju
६. कबीर ग्रंथावली, श्यामसुंदरदास
७. कबीर आधुनिक संदर्भ में , डॉ.राजदेव सिंह
८. भक्तिकोश, द्वितीय खंड, भारतीय संत, शंकर वासुदेव अभ्यंकर
९. आधुनिक परिप्रेक्ष्य में कबीर की प्रासंगिकता, अफसर अली
१०.संत काव्य की प्रासंगिकता (लेख), डॉ,रवींद्रनाथ मिश्र